# नवी मुंबई महानगरपालिका
## महापालिका विशेष सर्वसाधारण सभा

महानगरपालिकेच्या मंगळवार, दिनांक 05 मार्च 2019 रोजी भरलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

### महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी

**माहे 05 मार्च 2019 ची विशेष सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-**<br><br>माहे डिसेंबर 2018 महिन्याच्या सर्वसाधारण सभेत श्री. मोमीन, सहा. संचालक, नगररचना यांचे कामकाजाबाबत अनुक्रमे 20 आणि 24 डिसेंबर 2018 रोजी उहापोह मोठया प्रमाणावर झाला आहे. श्री. मोमीन, सहा. संचालक, नगररचना यांनी स्थानिक प्रकल्पग्रस्तांवर मोठया प्रमाणावर अन्याय केला आहे. तसेच बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र देताना आम जनतेला वेठीस धरणे याबाबतच्या नियमांचा आणि कायदेशीर बाबींचा अन्वयार्थ चुकीचा लावुन कामकाजाची अडवणुक केली आहे. त्यामुळे नवी मुंबई परिक्षेत्रात भयभीत असे असुरक्षित वातावरण नागरिकांमध्ये निर्माण झाले आहे. यास्तव श्री. मोमीन, सहा. संचालक, नगररचना यांना महानगरपालिकेच्या सेवेतुन तात्काळ कार्यमुक्त करुन त्यांची सेवा शासनाच्या मुळ विभागात प्रत्यावर्तित करण्यात यावी. | 04<br>मार्च | 1069<br>05/03/2019<br>(विशेष सभा) | मंजूर |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 5**<br>**दिनांक 05 मार्च 2019** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने खेळाडु दत्तक घेऊन व्यवसायिक संघ तयार करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/02/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/क्रिडा व सांस्कृ/134/2019. |
| **ठराव क्र. 1070**<br>**दिनांक 05 मार्च 2019** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने कबडडी, खो-खो व शुटींगबॉल या खेळाचे अंतिम निवड झालेल्या खेळाडुंना दत्तक घेऊन खेळाडुंना प्रोत्साहन देणेकरीता खेळाडु दत्तक योजना राबविणेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकिय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 6**<br>**दिनांक 05 मार्च 2019** | स्थायी समितीचा शुक्रवार, दिनांक 01 मार्च 2019 चा ठराव **465**:-<br>**"संदर्भ :-** आयुक्तांचे दिनांक.15/02/2019, चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./467/2019.<br><br>महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विविध वापराच्या नळजोडणीधारकांना प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, आकारण्यात येत असलेल्या पाणी दरांच्या प्रस्तावित **बाब क्रमांक 1.अ) पुर्वीचे फ्लॅटरेटधारक (सध्याचे जलमापकधारक) यांचे प्रमाणेच ब) गावठाण व झोपडपट्टीतील जलमापकधारक घरगुती ग्राहक आणि क) "अ" व्यतिरिक्त सर्व प्रकारच्या निवासी इमारती यांना प्रस्तावित रु. 4.75/- प्रती 1000 लिटर या ऐवजी दरमहा प्रती कुटुंब 30,000 लिटर पाणी वापरापर्यंत सरसकट दर महा प्रती कुटुंब रु.50/- व त्यापुढील प्रती 1000 लिटर पाणी वापरासाठी रु.4.75/- , बाब क्रमांक 2 मध्ये नमुद केल्यानुसार शाळा, कॉलेज, धर्मदाय नोंदणीकृत संस्था, शिक्षण मंडळे यांना प्रस्तावित रुपये 11/- या ऐवजी रुपये 4.75/- , बाब क्रमांक 3 क) मध्ये प्रस्तावित विना जलमापक ग्राहक (गावठाण व झोपडपट्टी क्षेत्रा अंतर्गत) साठी प्रस्तावीत रु.1830/- ऐवजी रु. 1000/- प्रती महिना बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र असलेल्या व भोगवटा प्रमाणपत्र प्रलंबित असलेल्या मात्र रहिवाशी वापर सुरु असलेल्या इमारती / घरे यातील ब ) एक वर्षापर्यंत भोगवटा प्रमाणपत्र सादर न केल्यास एक वर्षानंतरचा प्रस्तावीत रुपये 15/- या ऐवजी रुपये 7.50/-** या प्रमाणे दरआकारणी करणेस, या सुधारणेसह सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी. " |
| **ठराव क्र. 1071**<br>**दिनांक 05 मार्च 2019** | "महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विविध वापराच्या नळजोडणीधारकांना प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, आकारण्यात येत असलेल्या पाणी दरांच्या प्रस्तावित **बाब क्रमांक 1.अ) पुर्वीचे फ्लॅटरेटधारक (सध्याचे जलमापकधारक) यांचे प्रमाणेच ब) गावठाण व झोपडपट्टीतील जलमापकधारक घरगुती ग्राहक आणि क) "अ" व्यतिरिक्त सर्व प्रकारच्या निवासी इमारती यांना प्रस्तावित रु. 4.75/- प्रती 1000 लिटर या ऐवजी दरमहा प्रती कुटुंब 30,000 लिटर पाणी वापरापर्यंत सरसकट दर महा प्रती कुटुंब रु.50/- व त्यापुढील प्रती 1000 लिटर पाणी वापरासाठी रु.4.75/- , बाब क्रमांक 2 मध्ये नमुद केल्यानुसार शाळा, कॉलेज, धर्मदाय नोंदणीकृत संस्था, शिक्षण मंडळे यांना प्रस्तावित रुपये 11/- या ऐवजी रुपये 4.75/- , बाब क्रमांक 3 क) मध्ये प्रस्तावित विना जलमापक ग्राहक (गावठाण व झोपडपट्टी क्षेत्रा अंतर्गत) साठी प्रस्तावीत रु.1830/- ऐवजी रु. 1000/- प्रती महिना बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र असलेल्या व भोगवटा प्रमाणपत्र प्रलंबित असलेल्या मात्र रहिवाशी वापर सुरु असलेल्या इमारती / घरे यातील ब) एक वर्षापर्यंत भोगवटा प्रमाणपत्र सादर न केल्यास एक वर्षानंतरचा प्रस्तावीत रुपये 15/- या ऐवजी रुपये 7.50/-** या प्रमाणे दरआकारणी करणेस, या सुधारणेसह सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 7**<br>**दिनांक 05 मार्च 2019** | नवी मुंबई महानगरपालिका पाणी पुरवठा योजना टप्पा तीन अंतर्गत कळंबोली ते दिघा पर्यतची मुख्य वितरण वाहिनी टाकणे व तदनुषंगिक कामाचे कंत्राटाच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 26/02/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./587/2019. |
| **ठराव क्र. 1072**<br>**दिनांक 05 मार्च 2019** | "नवी मुंबई महानगरपालिका पाणी पुरवठा योजना टप्पा तीन अंतर्गत कळंबोली ते दिघा पर्यतची मुख्य वितरण वाहिनी टाकणे व तदनुषंगिक कामाचे कंत्राटाबाबत मा.जिल्हा व सत्र न्यायालय ठाणे यांच्याकडे दि. 21/02/2019 रोजी Civil Misc. Application No.57/2016 under section 36 of the |

| | |
|---|---|
| | arbitration & conciliation Act 1996 for stay of the award passed by shri. Subhash Govind Pingle, Sole Arbitration on 05/11/2015 अर्ज दाखल करण्यात आला होता. या अर्जावर दि. 25/02/2019 रोजी मा. न्यायालयाने मंजुर Award दि. 05/11/2015 च्या Execution & Opretion साठी स्थगिती दिली असुन या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. Arbitration Petition No 27/2016 ची पुढील सुनावणी दि. 15/03/2019 रोजी आहे. सदर पुढील सुनावणी दिनांकापर्यत Award रक्कम रु. 26,29,22,918/- + दावा दाखल केल्याचा दि. 28/04/2017 पर्यतचे 18% प्रमाणे व्याज रक्कम रु. 7,01,57,199/- सह एकुण रक्कम रु. 33,30,80,117/- च्या 75% रक्कम रु. 24,98,10,088/- चा भरणा न्यायालयात करणेबाबतच्या प्रस्तावास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 8**<br>**दिनांक 05 मार्च 2019** | नवी मुंबई महानगरपालिका पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. 3 अंतर्गत कंळबोली ते दिघा पर्यतची मुख्य वितरण वाहिनी टाकणे व तदनुषंगिक कामाचे कंत्राटाबाबत लवादामार्फतमे.प्रतिभा इंडस्ट्रिज लि. या कंत्राटदारास मंजुर केलेल्या दाव्याबाबतच्या प्रस्तावाबाबत (Claims) आयुक्तांचे दिनांक 22/02/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./536/2019 |
| **ठराव क्र. 1073**<br>**दिनांक 05 मार्च 2019** | "नवी मुंबई महानगरपालिका पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. 3 अंतर्गत कंळबोली ते दिघा पर्यतची मुख्य वितरण वाहिनी टाकणे व तदनुषंगिक कामाचे कंत्राटाबाबत लवादामार्फत मे.प्रतिभा इंडस्ट्रिज लि. या कंत्राटदारास मंजुर केलेल्या दाव्याबाबत (Claims) मा. न्यायालयाच्या जारी केलेल्या निर्देशानुसारचे Attachment Warrant च्या कार्यवाहीला स्थगीती मिळण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेला मा. न्यायालय आदेशीत करील त्याप्रमाणे रक्कमेचा भरणा करावा लागेल. मे.प्रतिभा इंडस्ट्रिज यांनी दाखल केलेल्या मागणी अर्जानुसार आज रोजी पर्यत रु. 41.51 कोटी इतकी रक्कम अदायगी करणे अंदाजीत आहे. तथापी मा. न्यायालयाकडुन येणा-या पुढील निर्देशा प्रमाणे उपरोक्त रक्कमेचा विनीयोग करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यास प्रस्तावास नमुद करण्यात आलेल्या बाबींसह सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**